**L. A. BILL No. XIV OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ६. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी ५३४-१ (२०५-७-२०२१)

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम १०९ मध्ये, पोट-कलम (३) मधील,— २०१७ चा महा. ६.

(एक) खंड (च) मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी, विहित कालमर्यादेत विद्यापीठाला प्राप्त झालेल्या अनुपालन अहवालाची अधिष्ठाता मंडळाकडून छानती करण्यात येईल आणि तो ३१ जुलै २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह, राज्य शासनाला पाठविण्यात येईल; " ;

(दोन) खंड (छ) मधील, दुसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी, या खंडान्वये ३१ ऑगस्ट २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी अंतिम मान्यता देता येईल. ".

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.]

[ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६
यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]

[श्री. उदय सामंत,
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

[ विधानसभेने दिनांक ५ जुलै २०२१ रोजी
संमत केल्याप्रमाणे.]

[ विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै २०२१ रोजी
संमत केल्याप्रमाणे.]

राजेन्द्र भागवत,
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई